AEON OF NEW ORGANISED RESEARCH AND ACADEMICS –

# ANORA

IV th Edition

**Indian women's Role at Achieving an equal future in the World**



CHIEF EDITOR

DR. INDRAJEET RAMDAS BHAGAT

BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

| | | |
|---|---|---|
| Chapter 20 | **Future Directions to Women Entrepreneurship**<br>Dr. Kunal Sil | 105 |
| Chapter 21 | **भारत में महिला सशक्तिकरण चुनौतियाँ और कठिनाइयाँ और सरकार के प्रयास**<br>- डॉ धर्मराज तंदुल्जेकर | 109 |
| Chapter 22 | **राष्ट्र निर्माण में नारी शक्ति की भूमिका**<br>- डॉ. राजेन्द्र राउत | 113 |
| Chapter 23 | **विरह जन्य पीड़ा के निमित्त आत्मसम्मान से साक्षात्कार : यशोधरा**<br>- डॉ. स्नेहलता कुमारी | 116 |
| Chapter 24 | **महिला सक्षमीकरण आणि समानतेची सुनिश्चितता**<br>- वैशाली रामकृष्ण सारणिकर | 120 |
| Chapter 25 | **स्त्री सशक्तिकरण व सामाजिक सुधार**<br>- डॉ. वंदना फटाले | 123 |
| Chapter 26 | **ग्रामीण महिलांच्या समस्या : एक व्यापक दृष्टिक्षेप**<br>- डॉ. बंडू जयसिंग कदम | 126 |
| Chapter 27 | **मराठी साहित्यात विज्ञान कथा लेखिकांचे योगदान**<br>- सुनीता प्रदीप रंगारी | 133 |
| Chapter 28 | **भारतीय महिलांचे क्रीडा क्षेत्रात योगदान**<br>- प्रा.भारत विठ्ठलराव पल्लेवाड | 138 |
| Chapter 29 | **महिलांशी संबंधित कायदे**<br>- डॉ. सोमा पी. गोंडाणे | 141 |
| Chapter 30 | **महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणासाठी उचललेली पावले**<br>- प्रा. डॉ. राहुल धुमाळ | 145 |
| Chapter 31 | **स्वरसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांचे भारतीय संगीत क्षेत्रातील बहुमूल्य योगदान**<br>- प्रा. स्वाती लक्ष्मणराव भगत (मनवर) | 149 |
| Chapter 32 | **भारतीय कृषीमध्ये महिलांची भूमिका**<br>- डॉ. विठ्ठल शंकरराव फुलारी | 152 |
| Chapter 33 | **भारतातील महिला सक्षमीकरणाच्या शासकीय योजना**<br>- डॉ. ज्ञानेश्वर शंकर वडजे | 155 |
| Chapter 34 | **The Role of Nutrition in managing the Menopause Syndrome**<br>[1]Kimeera Ambati &[2]Dr.S.SanthiSree | 159 |




TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

# Chapter 30

## महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणासाठी उचललेली पावले

**प्रा. डॉ. राहुल धुमाळ**
अर्थशास्त्र विभाग, तुळजाराम तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. जिल्हा पुणे

**प्रास्तविक-** सध्या जगात, भारतात आणि महाराष्ट्रातमहिला सक्षमीकरणाबाबत व्यापक अशी जागृती निर्माण झालेली आहे. महिला शिक्षण, रोजगार, कल्याण इत्यादीबाबत बरेच साहित्य प्रकाशित होत आहे. महिला अभ्यास क्षेत्रात बरीच प्रगती झालेली आहे. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरेकेले.१९८५ मध्येनैरोबी येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमध्ये प्रथमच महिला सक्षमीकरणाची संकल्पना मांडली.१९७९ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत महिलाबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करणे आणि देशाच्या न्यायव्यवस्थेत समानतेचे तत्व समाविष्ट करण्याबाबत ठराव मांडला. या सर्व घटनांमुळे महाराष्ट्र सरकारच्या धोरणामध्येमहिलासक्षमीकरणाबाबतउपाय योजले जाऊ लागले
या अनुषंगाने महिला सक्षमीकरणाचे विविध पैलू तसेच महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाबाबत उचललेल्या पावलाचा आढावा या लेखात घेतला आहे.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ-** स्त्रियांच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

सक्षमीकरणाची आवश्यकता- महिला सक्षमीकरणाची आवशकता पुढील कारणामुळे आवश्यक ठरते.

१) महिलांचे आरोग्य व जीवनमान उंचावणे.
२) महिलांच्या आर्थिक-सामाजिक व राजकीय प्रश्नांची सोडवणूक करणे.
३) महिलांवरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.
४) देशाच्या आर्थिक विकासाकरितास्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करून संतुलित विकास करणे.
५) स्त्रियांमध्ये कायद्याबाबत जागृती निर्माण करणे.

**सक्षमीकरणाचे घटक**

१) आरोग्य- महिलांचे आरोग्ययोग्यअसेल तरकौटुंबिक मानसिकता सुदृढ राहते, त्याकरिता महिलांना सकस आहार व वैद्यकीय सोयी मिळणे आवश्यक आहे.
२) शिक्षण -शिक्षणामुळे व्यवहार कौशल्य, उद्योजकता,संभाषण इत्यादी गुण प्राप्त होतात. म्हणून महिलांना उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
३) आर्थिक स्वावलंबन-महिला पैसे मिळवायला लागल्या तर त्या आर्थिक स्वावलंबी होऊन कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील.
४) कायद्याची जाणीव-सरकारने महिला करिता केलेल्या कायद्यामध्ये, हुंडाबळी, वडिलांच्या संपत्तीत वाटा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, पोटगी कायदायाची जाणीव व अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली तर



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati